


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २११, शनिवार ४ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेरमध्ये एक लाखांचे लीड घेणार!

■ आ. नीलेश लंके यांचा आत्मविश्वास
■ दहा वीस डफड्यावाल्यांकडून मताधिक्क्याविषयी अपप्रचार

भाळवणी : सुदेश आबूज

**तालुक्याच्या मताधिक्क्याविषयी दहा वीस डफड्यावाले इतर तालुक्यात अप्रचार करीत असले तरी सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे आपण तालुक्यातून किमान एक लाखांचे मताधिक्य घेऊ असा आत्मविश्वास महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी पारनेर तालुक्यातील विविध गावांमध्ये शुक्रवारी बैठका घेऊन मतदारांशी संवाद साधला. याच दौऱ्यादरम्यान भाळवणी येथे पार पडलेल्या बैठकीत नीलेश लंके यांनी तालुक्यातील मताधिक्क्याविषयी आपण निश्चिंत असल्याचे सांगितले.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, ही निवडणूक धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी आहे. निवडणूक लोकांनीच हाती घेतली आहे. पारनेर-नगर मतदारसंघात माझ्यावर जनतेने प्रेम करणे हे स्वाभाविक आहे. परंतू बाहेर गेल्यानंतर तेथील जनतेबरोबरच लहान-लहान मुलेही प्रेम करतात. हे पाहून अभिमानाने उर भरून येतो. असे असताना पारनेर विषयी इतर तालुक्यात वेगळे चित्र रंगवून अपप्रचार करण्यात येतो. खासदारकीची निवडणूक लढविण्याआधी आमदारकीचा राजीनामा देण्याचे धाडस मी दाखविले आहे. खासदार तर मी होणारच आहे. परंतू पारनेरला अपेक्षीत मताधिक्य न मिळाल्यास मी खासदारकीचा देखील राजीनामा देईल.

त्यामुळे कार्यकर्त्यांनी आपली जबाबदारी चोख बजवावी असे लंके यांनी सांगितले. यावेळी बाबासाहेब तरटे, बापूसाहेब शिर्के, गंगाराम बेलकर, प्रियंका खिलारी, संभाजी रोहोकले, राजेंद्र चौधरी, अशोक रोहोकले, दिपक पवार, नितीन अडसूळ, सुवर्णा धाडगे, बाळासाहेब पुंडे, बबन भुजबळ, आबासाहेब चेमटे, किरण ठुबे, संजय काळे, अमोल पवार, जयसिंग दावभट यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.



■ लोकसभा निवडणूकीच्या प्रचारार्थ नीलेश लंके यांनी शुक्रवारी भाळवणी येथे बैठक घेतली.

### बुलढाण्याच्या अध्यक्षांची दोन लाखांची मदत

बुलढाणा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवानंद पवार यांना कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान देण्यात आले होते. पवार यांनी लंके यांच्या निवडणूकीसाठी दोन लाखांची मदत दिली. गेल्या आठ दिवसांपासून पवार हे मतदारसंघात असून ते गावोगावी जाऊन लंके यांच्यासाठी मतदारांमध्ये जागृती करीत आहेत. एकदाच भेट झाली आणि या व्यक्तीशी आमचा स्नेह जुळला. आम्ही बुलढाण्याहून त्यांच्यासाठी इथे आलो. तुम्ही तुमच्या तालुक्याची अस्मिता जपण्यासाठी ऐंशी टक्क्यांहून अधिक मतदान लंके यांना करण्याचे आवाहन पवार यांनी केले. दरम्यान, शेगावच्या गजानन महाराजांचा प्रसाद तसेच शाल देउन पवार यांनी लंके यांचा सन्मान केला.

### तालुक्याची अस्मिता, हक्क जागृत ठेवा

पारनेर तालुका हा सेनापती बापट, अण्णा हजारे यांच्या विचारांचा तालुका आहे. २५ वर्षापूर्वी स्व. गुलाबराव शेळके यांच्या माध्यमातून पारनेरकरांना खासदारकीची संधी निर्माण झाली होती. दुर्दैवाने ती संधी मिळाली नाही. तालुक्याला २५ वर्षानंतर ही संधी आली आहे. त्यामुळे तालुक्यातील मतदारांनी तालुक्याची अस्मिता व हक्कासाठी जागृत होणे आवश्यक असल्याचे लंके म्हणाले.

### आपल्या लढतीकडे देशाचे लक्ष

या लढतीवर केवळ राज्याचेच नाही तर देशाचे लक्ष लागलेले आहे. नीलेश लंके खासदार झाल्यानंतर एका धनाढय शक्तीला पराभूत करून आलेला लंके कोण ? याची चर्चा दिल्लीतही होणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

### समोरचे उमेदवार आजोबा, पंजोबांचीच आश्वासने देत आहेत !

समोरचे उमेदवार त्यांच्या आजोबा पंजोबांनी दिलेली अश्वासने पुन्हा देत आहेत. त्यांच्या माध्यामातून गेल्या ५० वर्षात कोणताही प्रश्न सुटलेला नाही. तरीही चार सहा डफडेवाले तालुका डिस्टर्ब करीत आहेत, ज्यांच्या अंगावर आयुष्यात कधीही गुलाल पडला नाही डॉ. विखे समर्थकांना असा टोला लगावत पारनेरकरांसाठी हा लढा स्वाभिमानाचा आहे. आपल्या विजयाने पारनेरकरांची कॉलर टाईट होणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

### ते फक्त याच निवडणूकीला मते मागणार आहेत

लोकसभेच्या पुढील पंचवार्षिक निवडणूकीत शिर्डी मतदारसंघ खुला होणार आहे. त्यामुळे समोरचा विरोधक एवढयाच वेळी आपल्याकडे मते मागणार आहे. म्हणून तालुक्यातील मतदारांनी जागरूक होणे गरजेचे आहे. आपला विजय अटळ असल्याची पुस्तीही लंके यांनी जोडली.

### विखेंचे गुपीत लंके यांना सांगणार !

विखे परिवाराचा मी भाळवणीतील सर्वात जुना कार्यकर्ता होतो. राधाकृष्ण विखे यांना मी स्वतः कधीही फोन करू शकलो नाही. त्यांचा फोन पीएकडे असतो. त्यांच्या पीएलाही पीए आहेत. त्यांच्या निवडणूकीच्या कार्यपध्दतीची मला जवळून माहीती आहे. त्यांची सर्व यंत्रणा पेड यंत्रणा आहे. ते पैशांचे वाटप कसे करतात. याची मला माहीती आहे. ही सर्व माहीती खाजगीत लंके यांना सांगणार आहे. ४० वर्षे मी विखे यांच्या जवळ होतो. परंतू हे कृतघ्न कुटूंब आहे.

संभाजी रोहोकले सर
अध्यक्ष, पारनेर तालुका काँग्रेस कमिटी

### आम्ही नाराज नाही

शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरासाठी आम्ही स्वतः आमचे मंगल कार्यालय उपलब्ध करून दिले होते. कारण माणसे जगली तरच आमचे कार्यालय चालणार होते. आरोग्य मंदिर बंद झाल्यानंतर आ. लंके यांनी कार्यालयाच्या भाडयाविषयी देखील विचारणा केली होती मात्र नीलेश लंके यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून हजारो रूग्णांचे प्राण वाचवित सामाजिक बांधलकी जोपासली. या सामाजिक कामास आमचाही हातभार असावा म्हणून आम्ही या कार्यालयाचे भाडे स्विकारण्यास नम्रपणे नकार दिला. आम्ही नाराज असल्याच्या वावडया राजकीय वजन वाढविण्यासाठी कोणीतरी उठवत असून त्यात काहीही तथ्य नाही.

प्रा. बबनराव भुजबळ
संचालक, नागेश्वर मंगल कार्यालय, भाळवणी

### ते मंगल कार्यालय देखील माझ्या नावावर करून देतील

भुजबळ परिवाराची कोणतीही नाराजी नाही. त्यांनी कोव्हीड सेंटरसाठी विनामुल्य मंगल कार्यालय उपलब्ध करून दिले. मी मागणी केली तर त्यांची मुलेही मंगल कार्यालय माझ्या नावावर करून देतील असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### जनतेसाठी अहोरात्र काम करतोय

मी जनतेसाठी अहोरात्र काम करीत आहे. रक्ताचे पाणी करीत आहे. तालुक्यातील प्रत्येक गावात कोणत्या ना कोणत्या मार्गाने निधी देऊन कामे केली व लोकप्रतिनिधीचे कर्तव्य बजावले व मतदारांना अभिमान वाटेल असे काम करून दाखविले असल्याचे लंके म्हणाले.

# विजय औटी यांचे तडकाफडकी निलंबन

■ शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांची माहीती
■ भाजपा उमेदवार सुजय विखे यांच्या पाठींब्याचा निर्णय भोवला

नगर : प्रतिनिधी



**पक्षाचा आदेश झुगारून पक्षविरोधी कारवाई केल्यामुळे विधानसभेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते मा. आमदार विजयराव औटी यांना पक्षातून तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. औटी यांनी परवा महायुतीचे भाजपाचे उमेदवार सुजय विखे यांना मतदान करण्याचा फतवा काढला होता. त्याची दखल घेत वरीष्ठांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांनी औटी यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे.**

देशपातळीवरील इंडिया आघाडी तसेच महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष सहभागी आहे. महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून विजय औटी यांनी नीलेश लंके यांचे समर्थन करणे क्रमप्राप्त होते. मात्र औटी यांनी विरोधी उमेदवाराला पाठबळ देण्याचा निर्णय घेतल्याने जिल्हयात खळबळ उडाली होती.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर औटी यांनी तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष प्रियंका खिलारी, युवा सेनेचे तालुकाप्रमुख अनिल शेटे तसेच उपजिल्हाप्रमुख रामदास भोसले यांची बैठक बोलविली होती. या बैठकीत बहुतांश पदाधिकाऱ्यांनी उध्दव ठाकरे यांच्या आदेशानुसार आपण महाविकास आघाडीचा धर्म पाळून उमेदवार नीलेश लंके यांना मदत करू अशी भूमिका मांडली. त्यावर आपण दोन दिवसांनंतर निर्णय जाहिर करून औटी यांनी ही बैठक संपविली.

१ मे, महाराष्ट्रदिनी औटी यांनी रात्री उशिरा सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपाचे सुजय विखे यांना समर्थन देण्याचा संदेश दिला. या संदेशाने जिल्हयात एकच खळबळ उडाली. त्यानंतर जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलवून त्यांची भूमिका जाणून घेतली. सर्व पदाधिकारी तसेच प्रमुख शिवसैनिकांनी उर्वरीत पान ३ वर

# अण्णा हजारे म्हणाले, संधीचं सोनं करा!

आ. नीलेश लंके यांनी घेतले हजारे यांचे आशीर्वाद

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी गुरूवारी राळेगणसिध्दी येथे जात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेतले. संसदेमध्ये नेतृत्व करण्याची संधी पारनेर तालुक्याला मिळाली असून या संधीचे सोने करा असा सल्ला हजारे यांनी यावेळी दिला.**

लंके यांनी हजारे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. हजारे यांनीही तापमानात वाढ झाली असून प्रचार करताना उन्हापासून संरक्षण कसे होईल याच काळजी घेण्याचा सल्ला लंके व त्यांच्या समर्थकांना दिला. गेल्या अडीच महिन्यांपासून लोकसभेच्या मतदारसंघातील गावागावांत पोहचल्याचे लंके यांनी सांगितल्यानंतर हजारे यांनी आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, हा मतदारसंघ मोठा आहे. असे असतानाही जास्तीत जास्त गावांत जाउन जनतेशी संवाद साधण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे.

आमदार म्हणून पारनेर-नगर मतदारसंघाचे विधिमंडळात नेतृत्व करताना लंके यांनी गेल्या साडेचार वर्षात भरीव काम केले आहे. मतदारसंघातील जनतेपुढे त्यांचे काम आहे. लोकसभा निवडणूकीच्या माध्यमातून पारनेर तालुक्याचा प्रतिनिधी लोकसभेत जाण्याची संधी असून या संधीचे सोने करा असा सल्ला हजारे यांनी यावेळी दिला.



■ महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी राळेगणसिध्दीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेतले.

निवडणूका सुरू झाल्या की सर्वच उमेदवार आपल्या भेटीसाठी येतात. आपणही सगळयाच उमेदवारांना भेटतो. अलीकडेच या निवडणूकीतील भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे हे माझ्याकडे येऊन गेले. त्यांनाही मी आशीर्वाद दिले. परंतू विखे यांच्या काही कार्यकर्त्यांनी आपले विखे यांना समर्थन असल्याचा खोटा संदेश सोशल मीडियावर व्हायरल केला. आपण कोणत्याही उमेदवारास समर्थन देत नाही. तरीही असे करणे योग्य नाही. गैरसमज पसरविणे चुकीचे असल्याचे सांगत हजारे यांनी नाराजी व्यक्त केली.

# पारनेर तालुका शिवसेनेची शनिवारी बैठक

■ जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांची उपस्थिती
■ तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीसंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी पारनेर तालुका शिवसेनेची शनिवार दि. ४ मे रोजी सकाळी ११ वाजता पारनेर शहरातील सेनापती बापट स्मारक येथे बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांनी दिली. पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे हे यावेळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.**

या बैठकीस पक्षाचे सर्व पदाधिकारी, सर्व ज्येष्ठ शिवसैनिक, शिवसेना शाखाप्रमुख, युवा सेना शाखा प्रमुख, महिला आघाडी पदाधिकारी तसेच शिवसैनिकांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा पारनेर तालुक्यातून भाजपाचे उमेदवार सुजय विखे यांना पाठींबा असल्याचे विधानसभेचे माजी उपाध्यक्ष, माजी आमदार विजय औटी उर्वरीत पान ३ वर




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS 2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
• Salary commensurate based on skill, qualification and Experience.
• Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



# प्रगतीमंत्र




## पुण्याच्या आयसरमध्ये यंदापासून क्वांटम तंत्रज्ञानचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम

क्वांटम तंत्रज्ञानातील संशोधन विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने नॅशनल क्वांटम मिशन जाहीर केले आहे. त्यासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ घडवण्यासाठी देशात पहिल्यांदाच क्वांटम तंत्रज्ञान या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था अर्थात आयसर पुणे येथे सुरू करण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. आयसर पुणे ही केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील स्वायत्त शिक्षण आणि संशोधन संस्था आहे. २००६ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने विज्ञान संशोधन क्षेत्रात देशात ख्याती प्राप्त केली आहे. नॅशनल क्वांटम मिशनच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. अजय चौधरी, मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्रा. अजय सूद, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा अभय करंदीकर, आयसर पुणेचे संचालक प्रा. सुनील भागवत यांच्या उपस्थितीत क्वांटम तंत्रज्ञानातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नुकताच जाहीर करण्यात आला. सुरुवातीला २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. क्वांटम तंत्रज्ञानासाठी आवश्यक कौशल्य निर्माण करण्यासाठी दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे, अशी माहिती आयसर पुणेच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. सुदर्शन अनंत यांनी दिली.

## दहावी, बारावी निकाल केव्हा?

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी-बारावी परीक्षेचा निकाल यंदा पहिल्यांदाच मे महिन्यात जाहीर होणार आहे. मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात बारावीचा, तर चौथ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने राज्य मंडळ जलदगतीने तयारी करीत असल्याची माहिती राज्य मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

राज्य मंडळाकडून नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च आणि बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च यादरम्यान घेण्यात आली. दहावी-बारावीची परीक्षा सुरू असतानाच संबंधित विषयाची परीक्षा संपली की पेपर तपासणीचे काम सुरू करण्यात आले होते. पेपर तपासणी झाल्यानंतर संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी संकलन केंद्रांवर जमा करण्यासाठी ठरावीक मुदत देण्यात आली होती. त्यानुसार उत्तरपत्रिका संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.
दरवर्षी कोकण आणि मुंबई विभागाकडून उत्तरपत्रिका संकलन आणि अन्य काम उशिरापर्यंत सुरू असते. यंदा मात्र या दोन्ही विभागांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, राज्य मंडळाने यंदा उत्तरपत्रिका ठरावीक ठिकाणी जाऊन गोळा करण्यासाठी यंत्रणा कामाला लावली आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका गोळा करण्यासाठीचा कालावधी वाचला आहे. तसेच, परीक्षा झाली की दरवर्षी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार किंवा परीक्षा काळात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा कामास नकार, असे प्रकार सर्रास घडतात. यंदा मात्र असे कोणतेही प्रकार घडलेले नाहीत. त्याचबरोबर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशात लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीचे वातावरण राहणार आहे. त्यामुळे देखील निकाल लवकर लावण्यावर राज्य मंडळाचा भर असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.




> **“दरवर्षी बारावीचा निकाल जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल जुलै महिन्यात पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात लागत असतो. परंतु, यंदा मात्र परीक्षांमध्ये कोणताही मोठा गैरप्रकार होण्यापासून रोखण्याची कामगिरी करणाऱ्या राज्य मंडळाने निकाल लवकर लावण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यामुळे यंदा पहिल्यांदाच मे महिन्यातच दोन्ही निकाल जाहीर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा दहावी तसेच बारावीचा निकाल मे महिन्यातच जाहीर करण्यासाठी राज्य मंडळ प्रयत्नशील आहे. त्यानुसार मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात बारावीचा, तर चौथ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने राज्य मंडळाकडून दैनंदिन फॉलोअप सुरू असून, निकालाचे काम जलदगतीने करण्यासाठीच्या आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.**
>
> **– शरद गोसावी,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

## जेईई मेन्स परीक्षेचा निकाल लवकरच

नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएने जेईई मेन्स परीक्षेची तात्पुरती उत्तर की प्रसिद्ध केली आणि त्यावर काही आक्षेप असतील तर नोंदविण्यास सांगितले होते. त्यानंतर तज्ज्ञांच्या टीमने सर्व उपस्थित आक्षेप तपासले आणि त्यावर आधारित उत्तर की अंतिम केली आहे. त्यामुळे आता जेईई मेन्स परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची शक्यता प्रवेश परीक्षातज्ज्ञांनी यक्त केली आहे.

एनटीएने जानेवारी आणि एप्रिल या दोन सत्रांमध्ये जेईई मेन्स परीक्षा घेतली. एप्रिल सत्राचा निकाल जेईई ॲडव्हान्स २०२४ परीक्षेसाठी पात्र होण्यासाठी आवश्यक कटऑफसह घोषित केला जाणार आहे. दोन्ही सत्रांमध्ये मिळून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २४ लाखांहून अधिक आहे. सत्र १ मध्ये १२ लाख २१ हजार ६२४ आणि सत्र २ मध्ये १२ लाख ५७ हजार एवढी आहे. अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना उमेदवारांच्या सर्वोत्तम गुणांचा विचार केला जाईल. एनटीएने जाहीर केलेल्या पहिल्या सत्रातील निकालानुसार २३ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळविले. १०० टक्के गुण घेणारे तेलंगणमध्ये सर्वाधिक सात उमेदवार आहेत. त्यानंतर आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील प्रत्येकी तीन उमेदवार आहेत.




## बीबीए, बीसीए, बीएमएसच्या सीईटी नोंदणीसाठी 30 एप्रिलपर्यंत करा अर्ज




व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) पदवी अभ्यासक्रमांच्या सीईटीसाठी आतापर्यंत ४८ हजार १८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दरम्यान, या परीक्षेच्या नोंदणीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटीसेलने घेतला आहे. एमबीए, एमसीए या व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस हे पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला. बीसीए, बीबीए, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया होणार आहे. त्यानुसार बीबीए, बीसीए, बीएमएस अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या सीईटीची नोंदणी सुरू करण्यात आली. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी अनिवार्य आहे. मात्र, राज्यात पहिल्यांदाच होणाऱ्या या परीक्षेबाबत अद्याप फारशी जागृती नसल्याने नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याची गरज शिक्षण क्षेत्रातून व्यक्त करण्यात आली होती.

## ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार कॉलेज!

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील पत्र यूजीसीने देशातील सर्व विद्यापीठांना पाठवले आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कॉलेज सुरू करावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. कोरोनामुळे शैक्षणिक सत्र विस्कळीत झाले. त्यामुळे विद्यापीठांचे शैक्षणिक सत्र पुन्हा रुळांवर आणण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या यूजीसीने सर्व विद्यापीठांना ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रथम वर्ष पदवीपूर्व वर्ग सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. नियमांचा हवाला देत यूजीसीने विद्यापीठांना त्यांचे शैक्षणिक कॅलेंडर लवकर प्रसिद्ध करण्यास सांगितले आहे. जेणेकरून संस्थेचे व संलग्न महाविद्यालयांचे शैक्षणिक उपक्रम वेळेत पार पाडता येतील. शैक्षणिक सत्र पुन्हा रुळांवर आणण्याच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोगाने मागील पदवी वर्गांचे निकाल जूनच्या अखेरीस जाहीर करण्याची सूचनाही केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी यूजीसीने सर्व विद्यापीठे आणि उच्च शैक्षणिक संस्थांमधून प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रकल्पाचे काम आणि इंटर्नशिप आदी बाबी लक्षात घेऊन आयोगाने आणखी दोन आठवड्यांचा अवधी दिला आहे. पदवीसह पदव्युत्तर वर्ग सुरू करण्याची सूचनाही आयोगाने केली आहे.



## पुणे विद्यापीठात प्रवेश घ्यायचा ?



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील विविध विभागांतील पदवी, पदव्युत्तर आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश पूर्व परीक्षेसाठी अर्थ स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तरच्या प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या प्रवेश परीक्षेसाठी २० एप्रिलपासून अर्ज स्वीकारले जात असून अर्ज करण्याची अंतिम मुदत १० मेपर्यंत आहे. विद्यापीठात विविध विभागांत पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी आवश्यक प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. त्यानुसार ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी २० दिवसांची मुदत दिली आहे. पदवी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा १३ जून रोजी, तर पदव्युत्तरसाठी परीक्षा १४ ते १६ जून वादरम्यान होण्याची शक्यता आहे. प्रवेश परीक्षा १०० गुणांची असून, त्यासाठी दोन तासांचा अवधी आहे. प्रवेश परीक्षा ही ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. विद्यार्थ्यांनी एखाद्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज केल्यानंतर त्याची प्रवेश परीक्षा घेतली जाईल. त्यानंतर गुणवत्तेनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिले जातात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी प्रवेशासाठी इच्छुक असतात, प्रवेशाची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## शिक्षण हवं नोकरी देणारं!



**आज एखाद्या शैक्षणिक कोर्सची माहिती घेण्याच्या आधी त्यातल्या नोकऱ्यांच्या संधीबद्दल विचारणा करतात. कारण नोकरी मिळणं हे खूप महत्त्वाचं झालंय. म्हणूनच आजची शिक्षणपद्धती नोकरी मिळवून देऊ शकते का ? त्याबद्दल विद्यार्थ्यांना काय वाटतं ?**

- पुस्तकी शिक्षण नको : शिक्षण घेतल्याशिवाय नोकरी मिळणार नाही. पण या शिक्षण पद्धतीत काळानुसार बदल अपेक्षित आहेत. त्यामुळेच आपलं शिक्षण नोकरी देतं का हा मोठा प्रश्नंच आहे. पुस्तकी शिक्षण घ्यायचं की प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण घ्यायचं हे नोकरीच्या क्षेत्रानुसार ठरलं पाहिजे. पण तसं होताना दिसत नसल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.
- नोकरीची नकारघंटाच : आजच्या शिक्षण पद्धतीतले काही मोजकेच कोर्स नोकरीसाठी उपयुक्त ठरतात. उदा. बीएमएस. विशेषतः देशात किंवा परदेशात नोकरी मिळवण्यासाठी अशा कोर्सचा उपयोग होऊ शकतो. पण सर्व शिक्षणपद्धतीचा विचार केला तर ती नोकरी देणारी ठरते का ? हा प्रश्न विद्यार्थी उपस्थित करतात.
- व्यक्तिमत्त्व विकास हवा : हो. शिक्षण पद्धतींमध्ये अनेक बदल होताना दिसतायत. त्यातील प्रात्यक्षिकांचाही भाग वाढतोय. कॉर्पोरेट क्षेत्रात स्वतःचं स्थान पक्कं करण्यासाठी जगाची ओळख असणं गरजेचं असतं. काही अभ्यासक्रमांतून हे सगळं मिळतंय. पण तरीही लेखी संकल्पनात अडकण्यापेक्षा व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यायला हवा अशी सूचना विद्यार्थ्यांकडून होतेय.
- नोकरी नाहीच : सध्याची शिक्षण पद्धती नोकरीच्या दृष्टीने उपयुक्त नाही. मी कॉमर्सला आहे. पण मला नोकरी करण्यासाठी आवश्यक माहिती तिथे नाहीच मिळत. याऊलट अनेक संदर्भहीन विषय आम्हाला शिकवले जातात असं वाटतं. महाराष्ट्रात शालेय पातळीवरच्या अभ्यासक्रमांचा दर्जाही तितकासा चांगला नसल्याचे निरीक्षण विद्यार्थ्यांने नोंदविले आहे.

### आऊटडेटेड अभ्यासक्रम बदला

काही शाखांमध्ये शिकवला जाणारा अभ्यासक्रम ‘आऊटडेटेड’ आहे. दहावी, बारावीसोबत आता पदवी शिक्षणाकडेही केवळ उच्च शिक्षणासाठी लागणारी अनिवार्य अर्हता म्हणून पहिलं जातं. पदवी असली तरीही नोकरी मिळत नाही. मग त्याचा काय उपयोग ? असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडतो.



## शॉर्ट न्यूज

### सर्वोदय विदयालयास इंटरॅक्टिव्ह बोर्डची देणगी

■ **राजूर :** विदयार्थ्यांमध्ये नवनवीन माहिती तंत्रज्ञान विकसित व्हावे, या उद्देशाने प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग प्राव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीचे मालक व अकोले तालुक्यातील निंब्रळ गावचे भूमिपुत्र उदयोजक माणिकराव डावरे यांनी राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेच्या गुरूवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला दोन इंटरॅक्टिव्ह डिस्प्ले पॅनल बोर्ड देणगी रुपाने दिले. टप्प्याटप्प्याने आपल्या विद्यालयातील आणखी काही वर्ग स्मार्ट क्लासरूम मध्ये रुपांतरीत करण्याचा त्यांचा मानस आहे.

### कबूतर चोरल्याचा आरोप करीत मारहाण

■ **खराडी :** कबूतर चोरल्याचा आरोप करून एका तरुणास शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना संगमनेर तालुक्यातील येथील खराडी भागात घडली. खराडी येथील शाळेच्या पाठीमागे बिपीन उमेश हा तरुण राहतो. मनोज रावसाहेब चव्हाण (रा. श्रीरामपूर), रोहित भाऊसाहेब शिंदे, अमोल संजय शिंदे, राहुल संजय शिंदे व यश राजेंद्र शिंदे (सर्व रा. वाघापूर) यांन मेणे याला कबूतर चोरल्याचे सांगता लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी मेणे याने पोलिसांकडे फिर्याद दिली.

### सुजय विखेंचा शरद पवारांवर आरोप

■ **नगर :** सुजय विखे सध्या अहमदनगर लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रचार सभा घेत आहेत. या प्रचार सभेत पवारांसोबत होत असलेल्या संघर्षाबाबत बोलताना गोपीनाथ मुंडे आणि बाळासाहेब विखे सर्वसामान्यासाठी एकत्र आले. त्यावेळी पवारांनी कायमच आमच्या दोन्ही परिवाराला वेगवेगळ्या यंत्रणांचा वापर करून त्रास देण्याचे काम केलं. मात्र, आमच्या दोन्ही परिवारांनी संघर्ष केला. या जनतेने आम्हाला साथ दिली. त्रास जरी झाला तरी आम्ही संघर्ष सोडला नाही, असे देखील सुजय विखे यांनी म्हटले आहे.

### कोतुळ येथे आंबेडकर पदस्पर्श स्मृती सोहळा संपन्न

■ **कोतुळ :** विश्वरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४१ साली कोतुळ येथे पहिली महिला परिषद घेतल्याची नोंद सापडते, त्यांच्या पदस्पर्श।ने पावन झालेल्या कोतुळच्या भूमीत प्रति वर्षी पदस्पर्षभूमी सोहळा मोठया उत्साहाने साजरा केला जातो. विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या व्यक्तींचा विशेष गौरव आयोजकांकडून केला जातो या वर्षीचा युवा गौरव पुरस्कार असिस्टंट कमिशनर ऑफ स्टेट टॅक्स ऑफिसर झालेले संतोष शेळके कोतुळ यांना सन्मानपूर्वक देण्यात आला. डॉ. तेजस्विनी सोनवणे व डॉ. स्वप्नील साळवे यांनाही पुरस्काराने गौरविण्यात आले.

### वाकचौरे मोठ्या मताधिक्याने विजय होतील

■ **शिर्डी :** लोकसभेची निवडणूक राज्यघटना व लोकशाही वाचवण्यासाठी आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांनी प्रत्येक गावाशी संपर्क ठेवला असल्याने ते मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांनी व्यक्त केला. संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे - वडगाव पान गटातील गटातील लोहारे, कासारे, वरझडी, तळेगाव, चिंचोलीगुरव, देवकौठे, पारेगाव, सोनोशी, मालदाड, काकडवाडी गावांमध्ये भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ बैठका आणि भेटी दरम्यान संवाद साधताना ते बोलत होते.

# मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी माझा अनुक्रमांक तीन

## खा.डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन



**नगर : प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या तिसऱ्या प्रर्वाची ही वाटचाल सुरू आहे.  याच धर्तीवर मला अनु. क्र. ३ मिळाला आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी अनु.  क्र. ३ चे बटन दाबा असे आवाहन महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते नगरमधील एका संवाद सभेत बोलत होते.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ मे रोजी नगर मध्ये भव्य सभा होणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी  ठिकठिकाणी संवाद सभांचा वेग वाढविला आहे. नगर जिल्ह्यातील कामरगाव येथे अशाच संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ. विखे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या मागील दोन पर्वातील केलेल्या कामामुळे देशात मोदींच्या गॅरंटीवर लोकांचा गाढा विश्वास आहे. यामुळे त्यांची तिसऱ्या पर्वाकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. आणि हा नियतीचा योगायोग आहे की, त्यांच्या या वाटचालीत मला संधी देण्यासाठी तीन क्रमांकाचे बटन मिळाले आहे. यामुळे आता विजयांची चिंता उरली नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या विकासाच्या रथावर जिल्ह्याचा विकास साधण्याचे ध्येय मी उराशी बांधले आहे. म्हणुन तुम्ही सुद्धा या तिसऱ्या पर्वाचे साक्षीदार होण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती देश देण्यासाठी अनु क्रं ३ चे बटण दाबावे असे त्यांनी सांगितले. सदर संवाद सभेत जिल्हाबँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्यासह विविध स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# उमेदवारी देताना उदयनराजेंना भाजपकडून वाईट वागणूक

## सातारकरांना दोन-दोन खासदार देण्याची संधी खासदार अमोल कोल्हेंचे विधान



**सातारा : प्रतिनिधी**

**सातारकरांना जिल्ह्यातून दोन-दोन खासदार देण्याची संधी चालून आली आहे अशी ऑफर शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिली आहे. तसेच शरद पवार हे सर्वसामान्य जनतेसाठी अस्वस्थ होत असतील तर त्यांचा आम्हाला अभिमान आहे असा खोचक टोलाही त्यांनी लगावला आहे. महायुतीतीचे उमेदवार शशिकांत शिंदेंच्या प्रचारासाठी कोल्हे साताऱ्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.**

**उदयनराजेंना भाजपने वाईट पद्धतीने वागवले**

यावेळी त्यांनी सातारकरांना एक आवाहन केले आहे. सातारा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले हे छत्रपतींच्या गादीचे वारसदार आहेत. त्यांची राज्यसभेची अडीच वर्षे कारकीर्द अद्यापही बाकी आहे. असे असतानाही त्यांनी लोकसभा लढावी असा कोणी अट्टाहास केला? उमेदवारी देताना उदयनराजेंना भाजपने वाईट पद्धतीने वागवले. आता सातारकरांना जिल्ह्यात दोन खासदार देण्याची सुवर्ण संधी चालून आली आहे. एक तर उदयनराजे पहिलेच राज्यसभेचे खासदार आहेत. आता शशिकांत शिंदेंना लोकसभेवर निवडून देण्याची संधी आहे, असे आवाहन अमोल कोल्हे यांनी केले आहे.

**भटकती आत्माचा घेतला समाचार**

पुढे कोल्हे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शरद पवारांचा भटकती आत्मा असा उल्लेख केल्याचाही समाचार घेतला. ते म्हणाले, शरद पवार हे महाराष्ट्रासाठी अस्वस्थ होतात. गुजरातमधील भूकंप काळात पवारांनी आपत्ती निवारणासाठी पुढाकार घेतला होता. त्यांनी राज्यातील ७२ कोटींची कर्जमाफी शेतकर्यांना दिली होती. त्यातून चार कोटी शेतकऱ्यांचा साताबारा कोरा केला होता. देशाला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करण्याचे काम त्यांनी केले होते. हाच तो अस्वस्थ आत्मा होता. ते सर्वसामान्य जनतेसाठी अस्वस्थ होत असतील तर त्यांचा आम्हाला अभिमान आहे, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला.

**स्वार्थासाठी कोलांटा उड्या**


तर शिरुरबाबत अमोल कोल्हे म्हणाले, सध्या माझ्या समोरचे उमेदवार हे डमी उमेदवार असून ते उद्धव ठाकरे साहेबांशी धोका देऊन गद्दारी करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत गेले. या मतदारसंघातून मुख्यमंत्री शिंदेंच्या मनातही ते पहिल्या पसंतीचे उमेदवार नव्हते. त्यामुळे स्वार्थासाठी ते उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत गेले. त्यामुळे ते डमी उमेदवार असून त्यांनी स्वार्थासाठी कोलांटा उड्या मारलेल्या आहेत, अशी टीकाही कोल्हेंनी केली.

# प्रकाश आंबेडकरशनिवारी श्रीरामपुरात उत्कर्षा रुपवतेंसाठी प्रचारसभा

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**शिर्डी लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांच्या प्रचारासाठी श्रीरामपूर येथे संविधान निर्धार सभा आयोजित करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

शनिवारी (ता.४) मिनी स्टेडियम, कोर्ट रोड, श्रीरामपूर येथे दुपारी १२ वाजता सभा होणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या संयोजकांनी दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांचे राज्यभर दौरे सुरु आहेत. वंचित आघाडीच्याशिर्डी लोकसभा मतदारसंघातील उमेदवारउत्कर्षा रुपवते यांच्या



प्रचारानिमित्त त्यांची श्रीरामपुरात तोफ धडाडणार आहे. सभेसाठी जय्यत तयारी सुरु आहे. यावेळी ते आपल्या भाषणातून कोणावर निशाणा साधणार याची उत्सुकता आहे.

(पान १ वरून)

## विजय औटी यांचे तडकाफडकी निलंबन

आम्हाला विजय औटी यांचा निर्णय मान्य नसून आम्ही महाविकास आघाडीसोबत असल्याचे स्पष्टपणे सांगितले. या बैठकीनंतर उमेदवार नीलेश लंके यांच्याशीही पदाधिकारी, शिवसैनिकांनी संवाद साधला.

पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर प्रा. गाडे यांनी पक्षाचे संपर्कप्रमुख सुनील शिंदे यांना औटी यांचा पक्षविरोधी निर्णय तसेच पदाधिकाऱ्यांच्या भूमिका याबाबतचा अहवाल पाठविला. शिंदे यांच्या आदेशानंतर गुरूवारीच विजय औटी यांचे पक्षातून निलंबन करण्यात आले.

## पारनेर तालुका शिवसेनेची शनिवारी बैठक

यांनी १  मे रोजी जाहिर केले होते. त्यांच्या घोषणेपूर्वी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांनी मते जाणून घेतली होती. पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशानुसार महाविकास आघाडीच्या उमेदवारालाच आपण मदत करणे क्रमप्राप्त असल्याचे सर्व पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. त्यावेळी दोन दिवसानंतर आपण आपला निर्णय जाहिर करू असे औटी यांनी सांगितले होते.

पदाधिकाऱ्यांच्या भुमिकेस छेद देत दोन दिवसानंतर मात्र विजय औटी यांनी सुजय विखे यांना पाठींबा जाहिर केला. औटी यांची ही भूमिका पदाधिकाऱ्यांना रूचली नाही. जिल्हाप्रमुख प्रा. गाडे यांनीही पदाधिकाऱ्यांना जाब विचारत नगर येथे तातडीने बैठक बोलविली. या बैठकीत आम्ही महाविकास आघाडीसोबत असल्याचे सर्व पदाधिकाऱ्यांनी मान्य केले. पत्रकार परीषदेत तशी घोषणाही केली. या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारासंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी  प्रा. गाडे यांच्या उपस्थितीत या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.









# प्रचार सोडून आ. लंके बसले देणग्या स्विकारायला!

**■ निघोजच्या मळगंगा यात्रोत्सवास हजेरी ■ दरवर्षीप्रमाणे आ. लंके यांचा यंदाही सेवाभाव**

**निघोज : प्रतिनिधी**

**अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे यांच्यापुढे तगडे आव्हान उभ्या केलेल्या आ. नीलेश लंके यांनी निघोजच्या मळगंगा देवीच्या यात्रोत्सवाचे औचित्य साधून प्रचार बाजूला सारत दरवर्षीप्रमाणे भाविकांच्या देण्याच्या स्विकारण्याची जबाबदारी पार पाडली. मोठा मतदारसंघ आणि हायहोल्टेज लढत असतानाही लंके यांनी आपला सेवाभाव न चुकता पुर्ण केल्याने अनेकांनी त्यांचे कौतुक केले.**

निघोज ही माझी मायभुमी आहे. मळगंगेचा आशिर्वाद असल्याने आपणास सामाजिक कामासाठी मळगंगा मातेचे पाठबळ मिळते. त्यातूनच सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची उर्जा मिळते असे आ. लंके हे नेहमी सांगतात. दरवर्षी मळगंगा देवीच्या घागर मिरवणूकीच्या दिवशी न चुकता ते हजेरी लावतात. मिरवणूकीत सहभागी झाल्यानंतर देणगीच्या सभामंडपात येउन ते पावतीपुस्तक हाती घेतात. तासभर हा सेवाभाव केल्यानंतर त्यांचा पुढील प्रवास सुरू होते. गेल्या अनेक वर्षांपासूनची ही परंपरा यंदा लोकसभा निवडणूकीच्या धामधूमीतही आ. लंके यांनी कायम राखली.



**■ मळगंगा देवीच्या यात्रोत्सवात आ. नीलेश लंके यांनी देणगी कक्षात जाऊन पावत्या करण्याचे काम करीत दरवर्षीचा सेवाभाव जपला.**

### लोकनेता असावा तर असा

**लोकसभा निवडणूकीचा प्रचार रंगात आला असून आरोप, प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. येत्या १३ तारखेला मतदान असल्याने प्रत्येक दिवस व दिवसाचा क्षण ना क्षण उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी महत्वाचा आहे.असे असतानाही आ. लंके यांनी आपल्या सेवाभावाचा विसर पडू न देता देणगी पावत्या करण्यासाठी तासभर वेळ दिल्याने भाविकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत होते. लोकनेता असावा तर असा अशा अपसूक प्रतिक्रीया भाविकांकडून येत होत्या.**

राज्याच्या विविध भागांसह जिल्हयातील राहुरी, नगर शहर, नगर तालुका, श्रीगोंदे, कर्जत-जामखेड आदी भागांतील भाविक यावेळी उपस्थित होते. अनेक भाविकांनी उमेदवार नीलेश लंके यांना पावत्या करताना पाहून त्याच्या कामाचे वेगळेपणे नेहमीच जाणवत असल्याच्या प्रतिक्रीया दिल्या.

# स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेला ५१ हजार रुपयांच्या खुर्च्या भेट

**वांढेकर कुटुंबाचे आनंद प्रित्यर्थ योगदान**

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील निघोज येथील गौरव वसंत वांढेकर हे राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन महानगरपालिका उपायुक्त म्हणून त्यांची निवड झाल्याच्या आनंदप्रित्यर्थ वसंत वांढेकर व नंदाताई वांढेकर या आई वडील यांनी शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिकेला ५१ हजार रुपयांच्या खुर्च्या दिल्या आहेत.**

राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेनिमित्त बुधवार दि.१ मे रोजी सकाळी ११ वाजता मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या ताब्यात या खुर्च्या देण्यात आल्या. यावेळी वांढेकर कुटुंबाचा ट्रस्ट वतीने उपाध्यक्ष शांताराम लंके, कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव रामदास वरखडे, विश्वस्त शिवाजीराव वराळ, विश्वस्त बाळासाहेब लामखडे, विश्वस्त रमेश ढवळे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद , ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद,आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी जी.आर.एल. कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष गणेश लामखडे, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी संतोषशेठ रसाळ, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, अध्यक्ष बाबाजी वाघमारे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, महादेव कवाद, महेश ढुमणे, कुणाल तुपे, अक्षय खराडे आदी उपस्थित होते. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यावेळी म्हणाले गौरव वांढेकर आणि त्यांच्या कुटुंबियांनी शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेतील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी खुर्च्या देऊन एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. या अभ्यासिकेचा फायदा स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात होणार असून चागला प्रतिसाद मिळाला आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद यांनी केले शेवटी बाळासाहेब लामखडे यांनी आभार मानले.



### सर्वांच्या पाठबळाचे यश

**आई वडील व शिक्षक यांचे मार्गदर्शन तसेच मित्र परिवार नातेवाईक व आप्तेष्ट यांचे पाठबळ यामुळे एम.पी.एस.सी परिक्षा उत्तीर्ण झालो शिवाय चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याने महानगरपालिका उपायुक्त म्हणून निवड झाली आपल्याला स्पर्धा परीक्षा मध्ये अनंत अडचणी आल्या मात्र गुणवत्ता ही सर्वश्रेष्ठ असल्याने अडचण आली नाही. स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी काही तरी केले पाहिजे ही आई वडील यांची इच्छा असल्याने शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिकेला खुर्च्या देण्याचा निर्णय आई वडील यांनी घेतला. सामाजिक काम करताना कुटुंबाने मोठे योगदान दिले आहे ही माझ्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. हेच अनुकरण शासकीय सेवेत करणार.**

**गौरव वांढेकर**
**महानगरपालिका उपायुक्त**

### इमारतीची शोभा वाढली

**आमदार नीलेश लंके यांनी निघोज येथील शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेसाठी सव्वा कोटीचा निधी उपलब्ध करून इमारत बांधली असून यामध्ये ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा अभ्यास करता यावा यासाठी ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वांढेकर कुटुंबाने ५१ हजार रुपयांच्या खुर्च्या देऊन इमारतीच्या कळसाची शोभा वाढवली असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थ व विद्यार्थी यांनी व्यक्त केली आहे.**

### वांढेकरांची निवड अभिमानास्पद

**वसंत वांढेकर व त्यांचे कुटुंबीय सामाजिक कामांच्या माध्यमातून सेवाभाव करीत आहेत. गौरव वांढेकर यांनी एम.पी.एस.सी परिक्षा माध्यमातून एक सुवर्ण यश मिळवीले असून महानगरपालिका उपायुक्त म्हणून त्यांची निवड ही पारनेर तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब असून गुणवंतांचा तालुका म्हणून पारनेरचा राज्यात नावलौकिक आहे. शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेसाठी वांढेकर कुटुंबाने सामाजिक योगदान दिले ते कौतुकास्पद असून निघोजच्या शैक्षणिक संस्कृतीची शान वाढविण्यासाठी वांढेकर कुटुंबाचे योगदान मोठे आहे.**

**रामदास वरखडे**
**सहसचिव मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट**

# ग्रामीण भागातील जुन्या हॉटेलला ग्राहकांची पसंती

**मच्छिंद्रशेठ लंके यांचे प्रतिपादन**

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरातील जुन्या जाणत्या हॉटेलमध्ये रुचकर पदार्थ मिळत असल्याने ग्राहकांचा सर्वाधिक पसंती या हॉटेलकडे असून हॉटेल श्रीरामला पुन्हा पुर्वीचे वैभव मिळवून देण्यासाठी संतोष शेवाळे,शुभम शेवाळे व त्यांचे कुटुंबीय यशस्वी होतील अशी खात्री कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वे सर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांनी व्यक्त केले.**

मळगंगा देवीच्या यात्रेच्या शुभमुहूर्तावर शेवाळे बंधू यांच्या हॉटेल श्रीरामचे उद्घाटन लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्रामपंचायतचे माजी सदस्य भिमराव लामखडे, डॉ.चेतन झावरे, बाळासाहेब जगताप, पारनेर तालुका पैलवान प्रतिष्ठानचे पदाधिकारी पैलवान लंके, कन्हैया लस्सी सेंटरचे मालक प्रभाकर लामखडे, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी मंगेश खेडकर, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग आदी तसेच ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हॉटेल श्रीराम चे संचालक शुभम शेवाळे यावेळी म्हणाले आमच्या आजोबा आणी आज्जी यांनी हे हॉटेल गेली साठ वर्षांपूर्वी सुरू केले मात्र हॉटेल स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढल्याने नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला यासाठी लंके यांचे मार्गदर्शन मिळाले. मिसळ स्पेशालिस्ट म्हणून आमचे हॉटेल प्रसिद्ध आहे तीच रुचकर चव ग्राहकांना देण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.यावेळी हॉटेल श्रीरामचे मालक संतोष शेवाळे यांनी आभार मानले.

# घाणेगांव येथील अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**सप्ताहाचे २५ वे वर्ष; रविवारी सांगता**




**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**घाणेगांव येथील विठ्ठल रूख्मिणी व हनुमान मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला असून विविध महाराजांच्या किर्तनांना भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सप्ताहाचे हे २५ वे वर्ष आहे. शनिवारी या सप्ताहाची सांगता होणार आहे.**

पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते दुपारी १२ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते रात्री ९ हरिकिर्तन, रात्री १० ते पहाटे ४ हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रमांचे स्वरूप आहे.

रविवार दि.२८ एप्रिल रोजी गटेवाडी येथील ह.भ.प.मुक्ताई महाराज गट यांच्या हरिकिर्तनाने सप्ताहास प्रारंभ झाला. सोमवार दि.२९ रोजी देवदैठण येथील ह.भ.प.संतोष महाराज कौठाळे, मंगळवार दि.३० रोजी वाकोडी येथील ह.भ.प.अमोल महाराज जाधव, बुधवार दि१ रोजी नाशिक येथील ह.भ.प.ज्ञानेश्वरी ताई भोजंदरे, गुरूवार दि.२ रोजी जेउर हैबती येथील ह.भ.प. अक्षय महाराज उगले, शुक्रवार दि.३ रोजी शिर्डी येथील ह.भ.प विकास महाराज यादव यांची किर्तन सेवा झाली तर शनिवार दि४ रोजी पळवे खुर्द येथील ह.भ. प. सोमनाथ महाराज बारगळ यांची किर्तन सेवा होणार आहे. रविवार दि. ५ मे रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान श्री.क्षेत्र बाळनाथ गड येथील संतचरणरज छगन महाराज मालुसरे यांच्या काल्याच्या किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याची माहीती घाणेगांव ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.

# रविवारी भोयरे गांगर्डात भैरवनाथ यात्रा उत्सव

**■ यात्रोत्सवाची तयारी पूर्ण ■ मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई**



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथील ग्रामस्थांचे जागृत देवस्थान असलेल्या भैरवनाथ यात्रा उत्सवास रविवार दि. ५ मे रोजी प्रारंभ होत असून यात्रेची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली.**

नगर-पुणे महामार्गावरील सुपा येथून १२ कि.मी.अंतरावर भोयरे गांगर्डा तालुक्यातील शेवटच्या टोकाचे गाव असून येथे लोकसहभागातून ४० लाख रुपये खर्च करून भव्य भैरवनाथ, मारुती व शंकराच्या मंदिराचे काम पूर्ण झाले आहे. मंदीरासमोर भव्य अशा सभामंडपाचे काम देखील पूर्ण झाले आहे.

शुक्रवार दि. ३ रोजी सायंकाळी भैरवनाथांना तेल लावण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. देवाला तेल लावल्यानंतर यात्रा उत्सव पार पडेपर्यंत येथील ग्रामस्थ शेतातील सर्व कामे बंद ठेवतात.याला (मोढा) असे म्हणतात. रविवारी पहाटे ६ वाजता भैरवनाथाला पवित्र जलाने स्नान घातल्यानंतर महाआरतीने यात्रोत्सवास प्रारंभ होईल. दिवसभर येणाऱ्या भाविकांसाठी मंदिर खुले ठेवण्यात येणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता रसाळवाडी येथील मानाची काठी गावात आल्यानंतर सर्व काठ्यांची एकत्रित पुजा केली जाते. पुजा झाल्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावातून मिरवणूक काढण्यात येते. यादरम्यान येणारे भाविक व ग्रामस्थ शेरणी वाटप व दंडवत घेत दर्शनासाठी रांगा लावतात.

सायंकाळी ८ वाजता पालखीची वाजत-गाजत मिरवणूक काढली जाते. रात्री १० वाजता आलेल्या पाहुण्यांसाठी व ग्रामस्थांसाठी जगनकुमार सह हौसा वेळवंडकर यांचा लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे.

दुसऱ्या दिवशी सोमवार दि.६ रोजी सकाळी ९ वाजता हजर्याचा कार्यक्रम होईल. दुपारी ३.३० वाजता जंगी कुस्त्यांचा हगामा पार पडणार आहे. यादरम्यान परिसरातील मल्लांसह महिला मल्ल मोठ्या प्रमाणात हजेरी लावतात. यात्रेची तयारी पूर्ण झाली असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगा, पिण्याचे पाणी, वाहन पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवाचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भोयरे गांगर्डा यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रदीर्घ कालावधीनंतर बाबूशेठ टायरवाले पारनेरात!

**लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर कार्यकर्त्यांशी संवाद**

**पारनेर : प्रतिनिधी**

**पूर्वाश्रमीचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले हे राजकारणात पुन्हा सक्रिय झाले असून सध्या ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर कार्यकर्त्यांशी संवाद साधला.**

कार्यकर्त्यांशी संवाद साधताना टायरवाले म्हणाले, स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या जुन्या शिवसैनिकांची पसंती हिंदुत्व असून देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा बसविण्यासाठी डॉ. सुजय विखे यांना विजयी करण्याचे आवाहन टायरवाले यांनी केले.लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर टायरवाले यांनी पारनेर तालुक्याचा दौरा करून कार्यकर्त्यांशीसंवाद साधल्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला.

टायरवाले म्हणाले, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी फक्त आणि फक्त हिंदुत्ववादी विचारांच्या सहकाऱ्यांना मदत करण्याचा संदेश दिला होता. त्याचे पालन आम्ही करीत असून अहमदनगर दक्षिण मतदारसंघात आमचे शिवसैनिक भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांचा विजय मोठया मताधिक्क्याने करणार आहेत. टायरवाले म्हणााले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात भारत देशाला जगभरात एका वेगळया उंचीवर नेउन ठेवले. भारत देश आता महासत्तेच्या



दिशेने वाटचाल करीत आहे. विविध योजनांद्वारे सर्वसामान्य माणसाला दिलासा मोदी हे देत आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवून दिलासा देण्याचा प्रयत्न करत असल्याचे टायरवाले यांनी सांगितले. यावेळी अर्जुन शिर्के, चंद्रकांत नांगरे, ज्ञानदेव फापाळे, अनिल इथापे, प्रशांत भिसे, ताराचंद करंजुले, बाबुराव पवार, विठ्ठलराव मोरे, बबन गुंड, संभाजी बोरूडे, गजानन सोमवंशी, कचरू उबाळे, अजिम शेख, सुनील सोबले, सतीश म्हस्के, भागाजी भागवत आदी उपस्थित होते.

# जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा महिमा अगाध

**गीतांजली शेळके यांचे प्रतिपादन**



**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा महिमा अगाध असून मातेच्या आशिर्वादाने लाखो भक्तांना सुख समाधान शांती व समृद्धी मिळत असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांचे काम विकासाभिमुख असल्याचे प्रतिपादन जी.एस. महानगर बँकेच्या व जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी व्यक्त केले.**

मळगंगा देवीच्या दर्शनासाठी आलेल्या शेळके यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी अ‍ॅड.प्रियंका उदय शेळके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, जी.एस.महानगर बँकेचे संचालक बबनराव लंके, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, निघोज सोसायटीचे अध्यक्ष सुनिल वराळ, उपाध्यक्ष शांताराम लाळगे, सुरुची दूध उद्योग समूहाचे संचालक नानापाटील लंके, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर, सहसचिव रामदास वरखडे,पतसंस्थेचे संचालक दामूशेठ लंके, बाळासाहेब लामखडे, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी संतोषशेठ रसाळ, शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, ट्रस्टचे विश्वस्त कॅप्टन विठ्ठलराव वराळ, शिवाजीराव वराळ, शंकरराव लामखडे, बबनराव ससाणे, विश्वासराव शेटे, मंगेश लंके , सामाजिक कार्यकर्ते अनिल लंके, दिलीपराव लाळगे, बाळासाहेब लंके, वृक्षमित्र पोपटराव रसाळ, अ‍ॅड.ज्ञानेश्वर लामखडे , मळगंगा पतसंस्थेचे संचालक राजेंद्र लाळगे, जी.एस.महानगर बँकेचे अधिकारी लक्ष्मणराव साळवे, राहुल शेळके, विठ्ठलराव कवाद, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रूपेश ढवण, ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद, दिगंबर लाळगे, योगेश वाव्हळ, सोसायटीचे संचालक दत्तात्रय लंके, ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, भावना साळवे, युवा नेते विकास शेटे, अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतिष साळवे, पंढरीनाथ लंके, संजीवनी डेअरी फार्मचे अध्यक्ष संकेत लाळगे, संचालक विशाल जगदाळे, विनय लंके, ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे, उपव्यवस्थापक रोहन उनवणे आदी तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालिका गीतांजली शेळके यावेळी म्हणाल्या जिल्ह्यातील सर्वात मोठ्या यात्रेचे नियोजन अतिशय चांगल्या पद्धतीने करण्याचे काम मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ करीत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. एवढ्या मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात व सर्वांनाच देवीचे दर्शन मिळते हेच नियोजन महत्वपूर्ण असल्याचे सांगत त्यांनी ग्रामस्थांचे कौतुक केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com